माहितीचा
अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/३/कावि/ ६८ /२०१६
दिनांक :- ०५/ ०३ /२०१६

**विषय :- "आपले सरकार" पोर्टलद्वारे ऑनलाईन माहिती अधिकार कामकाज करणेबाबत...**

**आदेश,**

महाराष्ट्र शासनातर्फे **"आपले सरकार"** पोर्टलद्वारे दि. २६ जानेवारी २०१६ पासून ऑनलाईन माहिती अधिकार प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. याद्वारे नागरिकांना महानगरपालिकेसह विविध शासकीय कार्यालयांशी संबंधित ऑनलाईन माहिती अधिकार अर्ज व अपिल दाखल करणेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच सर्व शासकीय कार्यालयांकडे **"आपले सरकार"** अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांबाबत एकत्रित ऑनलाईन आढावा घेणेकामी मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालयामध्ये स्वतंत्र डॅशबोर्ड तयार करणेत आलेला आहे.

**"आपले सरकार"** पोर्टलद्वारे प्राप्त झालेल्या माहिती अधिकार अर्जावर करावयाच्या कार्यवाहीबाबतचे प्रशिक्षण संबंधितांना बुधवार दि. ०२/०३/२०१६ रोजी देण्यात आलेले असून त्याबाबतचे User ID व Password बाबतची माहितीदेखील सर्व संबंधितांना ई-मेलद्वारे पाठविणेत आलेली आहे. सबब, यापुढे महाराष्ट्र शासनाचे **"आपले सरकार"** माहिती अधिकार ऑनलाईन प्रणाली व महानगरपालिकेची ऑनलाईन माहिती अधिकार प्रणाली या **दोन्ही प्रणालींचा** नियमीतपणे वापर करणे व त्याद्वारे प्राप्त होणारे अर्ज मुदतीत निकाली काढणे हे संबंधित अधिकारी / कर्मचारी (माहिती अधिकारी / अपिलीय अधिकारी) यांना बंधनकारक आहे.

**"आपले सरकार"** ऑनलाईन प्रणालीद्वारे प्राप्त झालेले माहिती अधिकार अर्ज संबंधितांकडे वेळेत ऑनलाईन पाठविणेचे कामकाज **नागरी सुविधा केंद्र** विभागाने करावे. तसेच सदरचे कामकाज करणारे अधिकारी / कर्मचारी यांना संगणक प्रणालीच्या वापराबाबत तांत्रीक अडचणी असल्यास आपल्या विभागातील कॉम्प्युटर ऑपरेटर अथवा माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधावा.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत :- सहा. आयुक्त, नागरी सुविधा केंद्र
२/- माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीकामी

प्रति - सर्व माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी